महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार, दि.१२ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२० किंमत : ५ रु. | पाने ४

**दिन विशेष...**

१९१३ : यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन.
१९३० : महात्मा गांधी यांनी आजच्याच दिवशी दांडी यात्रा सुरु केली.
१९८० : सुप्रसिद्ध तबलावादक वसंतराव आचरेकर यांचा मृत्यू झाला.
१९८० : सुप्रसिद्ध गायिकांजनी मालपेकर यांना 'संगीत नाटक पुरस्कार'याच दिवशी मिळाला.

| सेन्सेक्स | ७८,२०५.९८ | +६३९.८२ (०.८२%) |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ९१.९६ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४० | १९ |
| दिल्ली | ३५ | २० |
| मुंबई | ३९ | २४ |
| नागपूर | ३७ | २० |
| पुणे | ३८ | १७ |

**सुविचार**

आपल्या आयुष्यातील सर्वात मोठा शत्रू म्हणजे आपली नकारात्मक विचारसरणी.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:४० संध्या-६:३६

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६४,७५०/- २,९०,०००/-

**केळी भाव**

नवती : ---- ते ----
पिल बाग : ---- ते ----
कांदे बाग : ----

# आखाती युद्धाची विधिमंडळाला झळ

## आमदार, कर्मचाऱ्यांवर उपाशी राहण्याची आली वेळ

वृत्तसंस्था । मुंबई

**इराण– अमेरिका आखाती युद्धाच्या झळा आता राज्यातही बसू लागल्या असून गॅस टंचाईमुळे हॉटेल बंद होऊ लागल्याने विधिमंडळातील सदस्य आणि कर्मराऱ्यांवर मंगळवारी रात्री उपाशी झोपण्याती आफत ओढवली. याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी विरोधकांनी बुधवारी विधानसभेत केली.**



विधानसभेचे कामकाज मंगळवारी मध्यरात्री १.१५ वाजता संपले. त्यावेळी विधिमंडळाचे उपहारगृह बंद झाल्याने तसेच गॅस टंचाईमुळे विधिमंडळ परिसरातील उपहारगृहे बंद असल्याने आमदार तसेच विधिमंडळ कर्मचारी, सुरक्षा रक्षकांना उपाशी रहावे लागले. आज विधानसभेचे कामकाज सुरु होताच काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी हा गंभीर मुद्दा सभागृहाच्या निदर्शनास आणला. राज्यात सध्या घरगुती गॅसचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून, सर्वसामान्य गृहिणींमध्ये भीती आणि अस्वस्थतेचे वातावरण आहे. एकीकडे सरकार विकासाच्या गप्पा मारत असताना दुसरीकडे जनतेला आपली चूल कशी पेटवायची, याची चिंता सतावत आहे.

सरकारने या गंभीर परिस्थितीवर तात्काळ आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. राज्यातील सद्यस्थिती मांडताना वडेट्टीवार यांनी काल विधानसभेचे कामकाज रात्री एक वाजेपर्यंत सुरू असताना उपहारगृह बंद होते. बाहेरील हॉटेल्स गॅसअभावी बंद आहेत. मुंबई आणि नागपूरमधील सुमारे ३०टक्के हॉटेल्स गॅस तुटवड्यामुळे बंद ठेवण्यात आली आहे. याचा मोठा फटका अर्थव्यवस्थेला बसत आहे अशी माहिती दिली. गॅसच्या तुटवड्यामुळे काळाबाजार वाढण्याची भीती असून, काल एचपीसी कंपनीच्या १८ लाख रुपयांच्या सिलिंडरची गाडी चोरीला जाण्याची घटना घडली आहे.

ही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने भयावह स्थिती आहे. गॅस टंचाईच्या निषेधार्थ कोल्हापूर आणि विदर्भासह राज्यभरात आंदोलने सुरू झाली आहेत. त्यामुळे राज्य सरकारने गॅस पुरवठा बाबत परिस्थिती सांगितली पाहिजे. युद्धजन्य परिस्थिती किंवा जागतिक कारणांमुळे पुरवठा विस्कळीत झाला असेल, तर सरकारने सध्या साठा किती उपलब्ध आहे आणि पुरवठा सुरळीत करण्यासाठी राज्य सरकार काय उपाययोजना करत आहे, याचे निवेदन सरकारने सभागृहात केले पाहिजे अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांनीही हा विषय केंद्राशी संबंधित असला तरी राज्य सरकार जनतेच्या हितासाठी सर्व उचित उपाययोजना करीत असून सरकारने याकडे गांभार्याने लक्ष द्यावे अशा सूचना दिल्या.

### गॅस टंचाईवर ठोस पाऊलं गरजेची

**इराण- अमेरिका आखाती युद्धाच्या झळा आता राज्यातही बसू लागल्या आहेत. गॅस टंचाईमुळे हॉटेल व्यवसाय बंद होऊ लागल्याने विधिमंडळातील सदस्य आणि कर्मचाऱ्यांवर मंगळवारी रात्री उपाशी झोपण्याची आफत ओढवली.राज्यातील विधिमंडळातील सदस्य, आमदार तसेच विधिमंडळातील कर्मचारी यांना केवळ गॅस टंचाईमुळे उपाशी राहण्याची वेळ आली. तर सामान्य नागरिकांचे टंचाईने काय हाल होतील? याची कल्पना न केली तर अंगावर काटा येईल. यासाठी तातडीने टंचाईवर मात करण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.**

## थोडक्यात

### इराणबाबत मध्यस्थी करण्यास कतारचा नकार

**दोहा ।** इराण–अमेरिका, इस्रायल संघर्षामध्ये मध्यस्थी करण्यास कतारने नकार दिला आहे. इराणकडून कतारवर हल्ले केले जात असताना मध्यस्थी केली जाऊ शकत नाही, असे कतारने म्हटले आहे. कतारचे परराष्ट्र राज्यमंत्री मोहम्मद बिन अब्दुलअझिझ अल–खुलायफी यांनी एक निवेदन प्रसिद्धीस देऊन ही भूमिका स्पष्ट केली आहे. इराण आणि पास्चात्यांमध्ये सेतू म्हणून कतार आणि ओमान दोन्ही देशांनी काम केले होते. तरीही कतार आणि ओमानवर इराणने हल्ले केले आहेत. त्यामुळे हल्ले होत असताना आम्ही मध्यस्थीची भूमिका निभावू शकणार नाही.

### इन्स्टाग्राम झाले अचानक बंद !

**नवी दिल्ली ।** सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अचानक येणाऱ्या तांत्रिक समस्यांमुळे लाखो वापरकर्त्यांना त्रास होतो. जगातील सर्वात लोकप्रिय फोटो आणि व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म इंस्टाग्राम अचानक बंद पडल्यावर नेमके हेच घडले.
अनेक वापरकर्त्यांनी ॲप आणि वेबसाइट दोन्हीवर समस्या येत असल्याची तक्रार केली. विशेषतः, त्यांना त्यांचे फीड ॲक्सेस करता आले नाही, ज्यामुळे नवीन पोस्ट आणि अपडेट्स पाहणे कठीण झाले.इंस्टाग्रामची सेवा अचानक बंद झाली.अनेक वापरकर्त्यांनी तक्रार केली की इंस्टाग्राम ॲप आणि वेब पोर्टल दोन्ही व्यवस्थित काम करत नाहीत. काहींसाठी, ॲप उघडत होते, परंतु फीड लोड होत नव्हते. अनेक वापरकर्त्यांना नवीन पोस्ट किंवा अपडेट्स अजिबात दिसत नव्हते. यामुळे सोशल मीडियावर तक्रारींचा सतत प्रवाह सुरू झाला.

## पाकिस्तानचा लाजिरवाणा पराभव! बांगलादेशने उडवला धुव्वा

### पहिल्याच वनडेत ८ गडी राखून मिळवला विजय

वृत्तसंस्था । कोलंबो

**आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत बांगलादेशने खेळण्यास नकार दिला होता. त्यामुळे बांगलादेशच्या जागी स्कॉटलँडला खेळण्याची संधी दिली गेली होती. तर पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेत खेळवले गेले होते. पण पाकिस्तानला सुपर ८ फेरीतून बाहेर पडावं लागलं.**

ही स्पर्धा झाल्यानंतर आता पाकिस्तानचा संघ सध्या बांगलादेश दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा सुपर फ्लॉप शो पाहायला मिळाला आहे. प्रथम फलंदाजीसाठी करण्यासाठी आलेला पाकिस्तानचा डाव अवघ्या ११४ धावांवर आटोपला. या सामन्यात सलामीला (पान २ वर)

## कंत्राटासाठी ४० लाखांची लाच; मध्य रेल्वेचा वरिष्ठ अधिकारी अटकेत

प्रतिनिधी । मुंबई

**खासगी कंपनीला ४० कोटींचे कंत्राट देण्यासाठी ४० लाखांची लाच मागणाऱ्या मध्य रेल्वेच्या मुख्य विद्युत वितरण अभियंत्यांसह दोन खासगी इसमांना केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी अटक केली.**




संबंधित अधिकाऱ्याशी मुंबई, नवी मुंबई, कर्जत येथील पाच ठिकाणी छापे टाकून सुमारे ९० लाख रुपयांची रोकड तसेच ४२ लाखांचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. भारतीय रेल्वे सेवेतील विद्युत अभियंते २००३ मधील तुकडीतील हे अधिकारी आहेत. मध्य रेल्वेकडून विविध कामांसाठी ४० कोटींचे कंत्राट देण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती. या निविदेत घोटाळा झाल्याची माहिती सीबीआयला मिळाली होती. त्यामुळे या प्रकरणी चौकशी सुरु होती. संबंधित निविदा देण्यासाठी मुख्य विद्युत वितरण अभियंते रमेश कुमार चौवे यांनी कंत्राट रकमेच्या एक टक्का म्हणजे ४० लाख रुपयांची लाच मागितली होती. या लाचेचा दहा लाखांचा हप्ता स्वीकारला जाणार असल्याची माहिती मिळाल्यावरुन सापळा रचण्यात आला होता. चौवे हे प्रत्यक्ष लाच स्वीकारत असतानाच सीबीआय अधिकाऱ्यांनी त्यांना अटक केली. त्यांच्या कार्यालयातून दहा लाखांच्या लाचेची रक्कम ताब्यात घेण्यात आली. चौवे यांच्यासह अंशुल वर्मा आणि कनाय वर्मा या खासगी इसमांनाही सीबीआयने अटक केली.

चौवे यांच्या कार्यालयात लाचेच्या रकमेव्यतिरिक्त तीन लाख ८५ हजार रुपयांची रोकड सापडली. याशिवाय निवासस्थानी ९०.७९ लाखांची रोकड तसेच २४१.३० ग्रॅम सोने तसेच २५७७ ग्रॅम चांदी असा (पान २ वर)

## भारतात पहिल्यांदाच इच्छामरणाची परवानगी!

वृत्तसंस्था । गाझियाबाद



भारतात इच्छामृत्यूसंदर्भात एक महत्त्वाचा खटला समोर आला आहे. गाजियाबादमधील एका दाम्पत्याने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या मुलाला निष्क्रिय इच्छामृत्यू मंजूर केला आहे. हे प्रकरण उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील आहे.

राणा दाम्पत्याने त्यांचा मुलगा 'हरीश राणा', जो जवळजवळ १२ वर्षांपासून कोमात आहे, त्याच्यासाठी इच्छामृत्यूची मागणी केली होती. न्यायालयाने म्हटले आहे की त्याच्या बरे होण्याची कोणतीही आशा नाही.

न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. या निर्णयानंतर, इच्छामृत्यू म्हणजे काय आणि भारत आणि जगात त्याचे कायदे काय आहेत? याबद्दल पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## 'एलपीजी'चा पुरवठा वेळेत झाला नाही तर कोट्यवधी लोक बेरोजगार : केजरीवाल

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**देशात व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचा तुटवडा वाढत असल्याने अनेक शहरांतील हॉटेल्स व रेस्टॉरंट्स बंद पडण्याच्या स्थितीत आले आहेत. काही ठिकाणी हॉटेल्स सुरू असली तरी मर्यादित पदार्थच ग्राहकांना दिले जात आहेत. मध्यपूर्वेत सुरू असलेल्या इराण–इस्त्रायल युद्धाचा फटका भारतालाही बसत असल्याचे चित्र दिसत आहे.**



या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाचे प्रमुख नेते अरविंद केजरीवाल यांनी पत्रकार परिषद घेऊन एलपीजी टंचाईचा मुद्दा उपस्थित केला आणि केंद्र सरकारवर तीव्र टीका केली. पत्रकार परिषदेत बोलताना केजरीवाल म्हणाले की, देशभरात घरे, रेस्टॉरंट्स आणि उद्योगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या एलपीजीची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. दैनंदिन उत्पादन सुमारे ५० टक्क्यांनी घटल्यामुळे परिस्थिती गंभीर झाली आहे. भारतात वापरल्या जाणाऱ्या एलपीजीपैकी सुमारे ६० टक्के गॅस आयात केला जातो आणि त्यातील जवळपास ९० टक्के पुरवठा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून येतो. सध्याच्या युद्धामुळे हा पुरवठा कमी झाल्याने देशात संकट निर्माण झाले असल्याचा दावा त्यांनी केला.

**मुंबईतील ५० टक्के हॉटेल्स बंद**

केजरीवाल म्हणाले की, या टंचाईचा सर्वाधिक फटका हॉटेल व रेस्टॉरंट उद्योगाला बसत आहे. मुंबईत जवळपास २० टक्के हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स आधीच बंद पडली आहेत आणि पुढील दोन दिवसांत हा आकडा ५० टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो. लग्नाचा हंगाम सुरू असल्याने अनेक कुटुंबांना लग्न समारंभ पुढे ढकलावे लागू शकतात, अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली. केंद्र सरकारवर टीका करताना केजरीवाल म्हणाले की, गेल्या ७५ वर्षांपासून भारताच्या (पान २ वर)

### एक कोटी लोक बेरोजगार होणार

**एलपीजी संकटामुळे हॉटेल, रेस्टॉरंट आणि संबंधित उद्योगांमध्ये काम करणाऱ्या सुमारे एक कोटी लोकांच्या रोजगारावर गदा येऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला. याशिवाय देशात एलपीजीचा काळाबाजार वाढत असल्याचाही आरोप त्यांनी केला. इराणवर इस्रायल आणि अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाल्याचे ते म्हणाले.**

## जळगावमध्ये किरकोळ बाजारात लिंबू २०० रुपये किलो!



प्रतिनिधी । जळगाव

उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना जिल्ह्यात लिंबाच्या दरांनी विक्रमी झेप घेतली आहे. आवक घटल्यामुळे घाऊक बाजारात लिंबाला अलीकडे चांगला दर मिळत असून, त्याचा थेट परिणाम किरकोळ बाजारावर दिसून येत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीत लिंबू प्रति क्विंटल ९ हजार ते ११ हजार रुपये दराने विकला जात असताना, किरकोळ बाजारात लिंबाचा दर थेट २०० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सध्या जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळे व भाजीपाला आवारात दररोज केवळ पाच ते सहा क्विंटल इतकीच लिंबाची आवक होत आहे. सामान्य परिस्थितीत यापेक्षा दुप्पट ते (पान २ वर)

## चाळीसगावला अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाला हिरवा कंदील

### स्वतंत्र जिल्ह्याच्या दिशेने आणखी एक पाऊल

प्रतिनिधी । चाळीसगाव

**जिल्ह्यातील वेगाने विकसित होत असलेल्या चाळीसगाव तालुक्याने स्वतंत्र जिल्हा निर्मितीच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. शहरात अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाला मंजुरी मिळाल्यानंतर आता अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयालाही हिरवा कंदील मिळाला आहे. त्यामुळे चाळीसगावमध्ये जिल्हास्तरीय प्रशासकीय सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, प्रशासकीय आणि न्यायिक व्यवस्थेला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**




भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असलेल्या चाळीसगाव तालुक्यात गेल्या काही वर्षांत लोकसंख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र महसूल, न्यायालयीन, आरोग्य आणि परिवहन विभागाशी संबंधित अनेक कामांसाठी नागरिकांना सुमारे १०० किलोमीटर अंतरावरील जळगाव येथे जावे लागत होते. या प्रक्रियेत वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत असल्याची तक्रार (पान २ वर)

### स्वतंत्र जिल्हा निर्मिती शक्य

**चाळीसगावला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत असताना त्यादृष्टीने आवश्यक प्रशासकीय सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध होत असल्याने या मागणीला अधिक बळ मिळत आहे. स्वतंत्र जिल्हा निर्मितीसाठी आवश्यक असलेली प्रशासकीय यंत्रणा, न्यायालयीन व्यवस्था, आरोग्य सुविधा आणि महसूल कार्यालयांची उभारणी हे महत्त्वाचे निकष मानले जातात. त्या दृष्टीने आवश्यक सुविधा उभ्या राहत असल्याने भविष्यात स्वतंत्र जिल्ह्याच्या निर्मितीची शक्यता अधिक दृढ होत असल्याचे चित्र दिसत आहे.**

## राज्यातील १.०५ कोटी लाडक्या बहिणी अपात्र

वृत्तसंस्था । मुंबई

**सरकारने राज्यातील तब्बल १.०५ कोटी लाडक्या बहिणींना योजनेतून अपात्र ठरवल्याबद्दल राष्ट्रवादीच्या(शप) महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी टीका केली आहे.**



सरकारने राज्यातील तब्बल १.०५ कोटी लाडक्या बहिणींना योजनेतून अपात्र ठरवल्याबद्दल राष्ट्रवादीच्या(शप) महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी टीका केली आहे. खडसे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सरकारवर हा घणाघात केला आहे. खडसे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, राज्य विधिमंडळात महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण या विषयावर चर्चा सुरू असताना, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री आणि तज्ज्ञ मंडळी यावर भाषणे ठोकतील. मात्र दुसरीकडे राज्य सरकारने आतापर्यंत तब्बल १.०५ कोटी लाडक्या बहिणींना अपात्र ठरवले आहे. सरकारचा हा किती दुटप्पीपणा आहे? असा प्रश्न त्यांनी सरकारला केला आहे.

## संपादकीय

### अविश्वास ठरावाचे अस्त्र !

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधात विरोधी पक्षांतर्फे आणण्यात आलेला अविश्वास प्रस्ताव आता लोकसभेत चर्चेला घेण्यात आला आहे. त्यावर दहा तासांची चर्चा होणार आहे. सध्याच्या वातावरणात खरं म्हणजे पश्चिम आशियात जी आग लागली आहे त्यामुळे भारतातील इंधनपुरवठा, गॅसपुरवठा धोक्यात आला असताना त्यावर आधी चर्चा होणे अपेक्षित होते. काल विरोधी पक्षाच्या सदस्यांनी तसा आग्रह धरून कामकाज रोखून धरले, पण सरकार असे सांगत राहिले की, विरोधी पक्षानेच ओम बिर्ला यांच्या विरोधात अविश्वास ठराव आणला आहे. त्यामुळे त्याच्यावर आधी चर्चा करणे गरजेचे आहे. ही चर्चा सरकारच्याही सोयीची आहे, कारण या चर्चेमुळे विरोधी पक्षांच्या सदस्यांचा सगळा रोख लोकसभेच्या सभापतींची सभागृहातील भूमिका यावर केंद्रित असेल. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरचे आक्षेप काही काळ तरी बाजूला पडतील आणि ज्याला आपण विषयांतर म्हणतो ते विषयांतर अधिकृतपणे करण्याची संधी सरकारला मिळेल. अर्थात यामागचे पक्षीय राजकारण काहीही असले तरी लोकसभा सभापतींचे सभागृहातील वर्तन हा गेल्या काही दिवसातील आक्षेपाचाच मुद्दा ठरला आहे हे वास्तव आहे. विरोधी पक्ष सदस्यांना बोलूच द्यायचे नाही, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणात सतत अडथळे आणून त्यांचा माइक बंद करणे किंवा त्यांच्या भाषणाचा तपशील रेकॉर्डवरून काढून टाकणे असे सगळे प्रकार गेल्या काही दिवसांत घडले आहेत, ते लोकशाहीला अनुसरून नाहीत. ओम बिर्ला यांनी याबाबतीत कायमच पक्षपाती भूमिका घेतलेली पाहायला मिळाली आहे. दूरचित्रवाणीवर लोकसभेचे कामकाज पहात असताना ही बाब सामान्य माणसाच्याही लगेच लक्षात येते. विरोधी पक्षाचे नेते लोकसभेत बोलत असताना ओम बिर्ला यांचा चेहरा पाहण्यासारखा असतो. विरोधी पक्ष सदस्याची बोलण्याची मोकळीक जितकी मर्यादित करता येईल तितकी मर्यादित करण्याचा प्रयत्न बिर्ला यांच्याकडून सुरू असतो ही वस्तुस्थितीच आहे. त्यामुळे विरोधी पक्षाने शेवटी हे अविश्वास ठरावाचे अस्त्र उगारले आहे. अर्थात लोकसभेच्या सभागृहात सरकारकडे बहुमत असल्याने विरोधी पक्षांचा हा प्रस्ताव बहुमताच्या आधारे फेटाळला जाईल हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. पण मुद्दा असा आहे की विरोधी पक्षांनी लोकसभा सभापतींच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणणे हाच मुद्दा मुळात सभापतींसाठी नामुष्कीजनक आहे. त्यातून बदल होणे अपेक्षित आहे. आज या प्रस्तावावर चर्चा सुरू असताना गौरव गोगोई यांनी उत्तम भाषण केले. ते म्हणाले की संसदीय कामकाजात अनेक प्रकारची आयुधे असतात, पण या सभापतींच्या काळात प्रथमच असे दिसले आहे की सभागृहातील सभासदांच्या आसनापुढचा माइकसुद्धा सध्या शस्त्रासारखा वापरला जात आहे. विरोधी पक्षाचे सदस्य जेव्हा आक्रमकपणे बोलत असतात तेव्हा त्यांच्या पुढचा माइक बंद केला जातो आणि सत्ताधारी पक्षाचे सदस्य शिवराळ भाषेत भाष्य करत असतानाही त्यांच्या पुढचा माइक मात्र बिनधास्त चालू ठेवला जातो. या माइकचा कंट्रोल नेमका कोणाकडे आहे हेही कोणाला कळेनासे झाले आहे. याआधी सभापती ओम बिर्ला म्हणाले होते की या माइकचा कंट्रोल माझ्याकडे नसतो, पण एका प्रसंगात हे आढळून आले आहे की या माइकचा कंट्रोल सभापतींच्याच हातात असतो. त्यामुळे या माइकचाही आता सभापतींनी आयुधासारखा वापर सुरू केला आहे. गोगोई यांची ही टीका अत्यंत बोचरी होती. विरोधी पक्षाच्या अन्य सदस्यांनीही सभापतींच्या पद्धतीतील आक्षेप नेमकेपणाने लोकांपुढे मांडले आहेत. यापूर्वी राज्यसभेत जगदीप धनखड यांच्या कार्यकाळातही विरोधी पक्ष सदस्यांची अशीच मुस्काटदाबी सुरू होती; पण शेवटी धनखड यांची काय अवस्था झाली हे देशाने पाहिले आहे. ओम बिर्ला यांची तशी अवस्था होऊ नये अशी सगळ्यांची इच्छा आहे. पण बिर्ला ज्या आसनावर बसले आहेत त्या आसनाचा आणि सभागृहाच्या मर्यादेचा मान राखला पाहिजे.

# नुसते पद मिळवण्यापेक्षा त्या पदाला न्याय दिला पाहिजे

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे प्रतिपादन; शिवसेना प्रणित शिक्षक-शिक्षकेतर महिला कर्मचारी सेनेची कार्यकारिणी जाहीर

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी संघटनेचे महत्व सांगताना संघटनेशिवाय कोणी मोठा नाही. मी आज जे काही ते संघटनेच्या जोरावर आहे. नुसते पद मिळवून चालत नाही तर त्या पदाला न्याय दिला पाहिजे. समस्या सोडवल्या पाहिजे. आपण ज्या तालुक्यात आहात. त्या तालुक्यातील शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी तालुक्यावर मीटिंग घ्या. त्या समस्या आपले जिल्हा अध्यक्ष, सरचिटणीस यांना सांगा. नाही झाले तर त्या तालुक्यातील आपले आमदार, पदाधिकारी यांना सांगा. जर यांच्याकडून नाही सुटल्या तर पालकमंत्री म्हणून मी आहेच. शिवसेना प्रणित शिक्षक शिक्षकेतर महिला कर्मचारी सेना ही राज्यातील पहिली कार्यकारिणी मी आज जाहीर करतोय याचा आनंद होतोय. आता मी तुमच्यावर अजून एक नवीन जबाबदारी टाकतोय की अंगणवाडी, आशावर्कर, गटप्रवर्तक आणि आरोग्याची संघटना दोन महिन्यात उभी करा,असे आवाहनही त्यांनी केले.**



या कार्यक्रमास शिवसेना जिल्हा प्रमुख विष्णु भंगाळे, माजी सभापती राजेंद्र चव्हाण, शिक्षक सेना जिल्हा अध्यक्ष नरेंद्र सपकाळे, जिल्हा सरचिटणीस सुगनचंद नाना पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र पाटील, राज्यप्रतिनिधी महेंद्रसिंग पाटील, विभागीय उपाध्यक्ष टिकाराम नाना पाटील, तालुका अध्यक्ष भूषण पाटील धरणगाव, जिल्हा सल्लागार रमेश बोरसे,जिल्हा संघटक प्रभाकर पाटील, जिल्हा उपाध्यक्ष निलेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सचिन सरकटे, जिल्हा संघटक विजय गोसावी, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख लोकेश पाटील, जिल्हा संघटक निलेश पाटील यावल,जिल्हा संघटक विजय ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष सतीश सोनवणे, चोपडा तालुका अध्यक्ष चंद्रशेखर साळुंखे, जळगाव तालुका अध्यक्ष राजेंद्र पाटील, भडगाव तालुका अध्यक्ष यशराज निकम, ज्येष्ठ मार्गदर्शक निळूभाऊ चौधरी, विश्वास ठाकूर जळगाव, पाचोरा तालुका अध्यक्ष गणेश पाटील, तालुका उपाध्यक्ष देवेंद्र महाजन, तालुका अध्यक्ष पवनभाऊ रावेर आदीसह सर्व जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सेना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष संजय चव्हाण यांनी सांगितले की, जळगाव जिल्ह्यातील हा कार्यक्रम पाहून आमची सुद्धा जबाबदारी वाढली आहे. आजपासून शिवसेना या चार अक्षरांचे बळ आज तुमच्या पाठीशी आहे, असे आश्वासन त्यांनी दिले.

### शिक्षणासोबत आरोग्याकडे लक्ष द्या: आ. प्रा.चंद्रकांत सोनवने

चोपड्याचे आमदार प्रा.चंद्रकांत सोनवने म्हणाले की, शिक्षणासोबत आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. इतक्या मोठ्या गर्दीने महिला आज या कार्यक्रमास उपस्थित राहिल्या हे पाहून आमच्या शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी सेनेची वाटचाल योग्य दिशेने चालू आहे,असेही त्यांनी सांगितले.

### राज्यात पहिलीच कार्यकारिणी जाहीर

जळगाव जिल्हाध्यक्ष माधवी चव्हाण, जिल्हा सरचिटणीस ज्योती बोरसे एरंडोल, जिल्हा सल्लागार प्रियंका कुमावत जळगाव, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख ज्योती मराठे एरंडोल, जिल्हा कार्याध्यक्ष चारूलता पाटील पाचोरा, जिल्हा कार्याध्यक्ष लीना बोरोले रावेर, जिल्हा कोषाध्यक्ष रामेश्वरी बडगुजर यावल, जिल्हा उपाध्यक्ष वर्षा खैरनार जळगाव, जिल्हा उपाध्यक्ष शशिकला पाटील चोपडा, जिल्हा उपाध्यक्ष ज्योती पाटील यावल, जिल्हा उपाध्यक्ष कल्पना जयसिंग पाटील पाचोरा, जिल्हा उपाध्यक्ष ज्योती पाटील पारोळा, जिल्हा संघटक वैशाली झांबरे जळगाव, जिल्हा संघटक गजाला मॅडम रावेर, जिल्हा संघटक सोनल साळुंखे यावल, जिल्हा संघटक सुनंदा रोझोदकर जळगाव, जिल्हा संघटक योगिता मराठे जळगाव, जिल्हा संघटक मीरा दिढोळे धरणगाव, जिल्हा संघटक सोनाली पाटील एरंडोल, तालुका अध्यक्ष भाग्यश्री महाजन जळगाव, तालुका अध्यक्ष शितल सोनार धरणगाव, तालुका अध्यक्ष स्मिता बाविस्कर चोपडा त्यासोबतच विभागीय उपाध्यक्ष म्हणून वैशाली बाविस्कर जळगाव यांची निवड जाहीर करण्यात आली. महाराष्ट्रातील महिलांची शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी सेनेची पहिली कार्यकारिणीची सुरवात जळगावमधून झाल्याचा आनंद पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला.

# टंचाई निवारणासाठी समन्वयाने काम करा: जिल्हाधिकारी

प्रतिनिधी । धुळे

**जिल्ह्यातील टंचाई व चाराटंचाईच्या उपाययोजनांचा घेतला आढावा धुळे । प्रतिनिधी जिल्ह्यात संभाव्य पाणी टंचाई व जनावरांसाठी चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी समन्वयाने कामे करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात सातपुडा सभागृहात पाणी टंचाई व चारा टंचाईबाबत आढावा बैठक झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या.**



या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, कार्यक्रारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जयश्री सार्वे, कार्यकारी अभियंता धुळे पाटबंधारे विभाग, धुळे देवेंद्र अग्रवाल, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय फडोळ, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गिरीष पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मनिष पवार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक ती पूर्वतयारी करावी. संभाव्य टंचाईग्रस्त गावांची माहिती अद्ययावत ठेवून आवश्यकता भासल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था तातडीने सुरू करावी. तसेच जनावरांसाठी चाऱ्याचा पुरेसा साठा उपलब्ध राहील यासाठी नियोजन करावे. चारा टंचाई भासणाऱ्या भागांची माहिती वेळेवर सादर करावी. टंचाई परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांना व शेतकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. निवासी उपजिल्हाधिकारी पवार यांनी सांगितले की, ज्या तहसिल कार्यालयाकडे विहीर अधिग्रहणांचा तसेच टँकरद्वारे पाणी पुरवठाचा प्रस्ताव आला असेल त्यांनी त्यास त्वरीत मंजुरी द्यावी,असे निर्देश त्यांनी दिले.

# मनपाच्या चार दवाखान्यांसाठी १६ कोटींच्या निधीस मान्यता

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील महापालिकेच्या चार दवाखान्यांच्या इमारतींसह अत्याधुनिक यंत्रसामग्रीसाठी जिल्हा नियोजन विकास समिती (डीपीडीसी) मधून १५ कोटी ७२ लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या निधीमुळे धुळेकरांना सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे.**

या संदर्भात शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी शहरातील महापालिका दवाखान्यांचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच नवीन इमारती व अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार डीपीडीसीच्या माध्यमातून या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. अग्रवाल यांनी पालकमंत्री रावल यांचे आभार मानले आहेत. या निधीतून प्रभातनगर, मोगलाई (साक्री रोड) येथील टीबी सेंटर, हुडको (चाळीसगाव रोड) आणि मोहीड उपनगरातील प्रभाग १८ येथील महापालिका दवाखान्यांमध्ये मोड्युलर प्रसूतिकक्ष उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक दवाखान्यासाठी ३ कोटी ९३ लाख रुपये असा एकूण १५ कोटी ७२ लाखांचा निधी मंजूर केला आहे.

## पान १ वरुन

**कंत्राटासाठी ४० लाखांची.....**

४२.५२ लाखांचा ऐवज सापडला. या शिवाय या छाप्यात मालमत्तेत गुंतवणूक केल्याचीही कागदपत्रे सीबीआयच्या हाती लागली. याशिवाय देशभरातही काही ठिकाणी या मालमत्ता असल्याचेही चौकशीत स्पष्ट झाले. आतापर्यंत एक कोटी ४७ लाखांची एकूण मालमत्ता सीबीआयने हस्तगत केली आहे. या शिवाय काही आक्षेपार्ह कागदपत्रेही सापडली आहेत.

**जळगावमध्ये किरकोळ बाजारात .....**

तिप्पट आवक होत असते. मात्र, यंदा काही भागांत उत्पादन घटल्यामुळे बाजारात विक्रीयोग्य मालाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये लिंबासाठी स्पर्धा वाढली असून लिलावात दर झपाट्याने वाढत आहेत. जळगाव जिल्ह्यात यंदा मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या आसपास पोहोचला आहे. उष्णतेमुळे नागरिक मोठ्या प्रमाणात लिंबूपाणी, सरबत, पन्हे आणि इतर थंड पेयांचा वापर करत आहेत. हॉटेल, रेस्टॉरंट, ज्यूस सेंटर तसेच फेरीवाले यांच्याकडूनही लिंबाची मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे. त्यामुळे बाजारात लिंबाची मागणी अचानक वाढली आहे.

मात्र, मागणीच्या तुलनेत पुरवठा मर्यादित असल्याने लिंबाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. घाऊक बाजारात दर वाढल्यामुळे किरकोळ विक्रेत्यांनाही लिंबू महागात घ्यावा लागत आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात लिंबाचा दर १८० ते २०० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. काही ठिकाणी लिंबू नगाप्रमाणे विकला जात असून, एका लिंबासाठी ग्राहकांना पाच रुपये मोजावे लागत आहेत. आकार आणि गुणवत्तेनुसार काही विक्रेते सहा ते सात रुपये दरही आकारत असल्याचे दिसून येत आहे.

**पाकिस्तानचा पराभव.....**

आलेल्या जोडीने ४१ धावा जोडल्या होत्या. त्यानंतर पुढील ७३ धावांत संपूर्ण संघाचा डाव आटोपला. या धावांचा पाठलाग करताना बांगलादेशने ८ गडी राखून विजय मिळवला आहे.

**'एलपीजी'चा पुरवठा .....**

परराष्ट्र धोरणाचा आधार असलेले अलिप्तता धोरण कमकुवत करण्यात आले आहे. पंतप्रधानांनी इस्रायलला उघड पाठिंबा दिल्यामुळे त्याचा परिणाम भारताच्या ऊर्जा पुरवठ्यावर झाला असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**चाळीसगावला अतिरिक्त .....**

वारंवार पुढे येत होती. त्यामुळे प्रशासकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने होत होती. या मागणीच्या पार्श्वभूमीवर चाळीसगावमध्ये अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाला मंजुरी मिळाल्याने गुन्हेगारी, दिवाणी आणि फौजदारी प्रकरणांच्या सुनावण्या आता स्थानिक पातळीवरच होऊ शकणार आहेत.

न्यायालयात वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांच्या निकाली प्रक्रियेला वेग मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी हा निर्णय मोठा दिलासा देणारा ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, वाढत्या लोकसंख्येसह भौगोलिक विस्तार आणि महसूल विभागावरील ताण लक्षात घेऊन मंत्रिमंडळाने राज्यात ११ ठिकाणी अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यात जळगाव जिल्ह्यातील चाळीसगावचाही समावेश करण्यात आला असून, त्यासाठी लवकरच अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांसह इतर १३ पदांची भरती केली जाणार आहे.

# एरंडोल येथे चार वर्षीय बालिकेवर अत्याचार : संतप्त जमावाचे रास्तारोको आंदोलन

प्रतिनिधी । जळगाव / एरंडोल

**येथील लांडापूर भागातील चार वर्षीय बालिकेवर तिच्याच नातेवाईक असलेल्या ५९ वर्षीय मामे आजोबाने अत्याचार केल्यामुळे संतप्त जमावाने संशयित विरोधात कडक कारवाई मागणीसाठी राष्ट्रीय महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले.**

अमळनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते. अदिवासी नेत्या प्रतिभा शिंदे यांचेसह एरंडोलचे पोलीस निरीक्षक निलेश गायकवाड,पारोळ्याचे निरीक्षक अशोक पवार,धरणगावचे निरीक्षक सुनील पवार, कासोद्याचे सहाय्यक निरीक्षक श्रीकांत पाटील यांनी संतप्त जमावाची समजूत काढली .संशयितास अटक करण्यात आली असून त्याचे विरोधात कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. याबाबत माहिती अशी,की शहरातील लांडापूर भागात राहणारी चार वर्षीय बालिका दुपारी बारा वाजेच्या सुमारास आपल्या घरात आई व भावंडासह खेळत होती.बालिकेची आई प्रात:विधीसाठी गेल्यानंतर पंधरा मिनिटांनी घरी आली असता त्यांना चार वर्षीय बालिका घरात आढळून न आल्याने तिने मुलांसह आजूबाजूला चौकशी केली.घराशेजारीच राहणारे बालिकेचे नात्याने मामेआजोबा असलेल्या नातेवाईकाकडे बालिकेची आई चौकशीसाठी गेली असता त्यांना घराचा दरवाजा अर्धवट स्थितीत लावलेला दिसून आला. बालिकेच्या आईने त्यांचेकडे तिची चौकशी केली असता त्याने मला माहित नसल्याचे सांगितले. मात्र त्याने चार वर्षीय बालिकेवर केल्याची घटना त्या महिलेने पतीला दिली. याबाबत बालिकेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून संशयित विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी संशयितास अटक केली आहे. सहाय्यक निरीक्षक शंकर पवार तपास करीत आहेत.दरम्यान चार वर्षीय बालिकेवर अत्याचार झाल्याची घटना समजताच संशयीता विरोधात कडक कारवाई करावी, अशी मागणी करत महिला व पुरुषांनी राष्ट्रीय महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले. उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते,पोलीस निरीक्षक निलेश गायकवाड यांचेसह हवालदार अनिल पाटील,आकाश शिंपी,पोपट सोनार, सचिन पाटील,दीपक पाटील यांचेसह पोलीस कर्मचा-यांनी आंदोलनस्थळी धाव घेवून संतप्त जमावाची समजूत काढून विस्कळीत झालेली वाहतूक पूर्ववत केली.

# मोलगी–भगदरी रस्त्याचे डांबरीकरण न झाल्यास आंदोलन

## युवा क्रांती संघटनेचा आंदोलनाचा इशारा ; सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन

प्रतिनिधी । कोलवीमाळ

**तालुक्यातील मोलगी ते भगदरी हा अत्यंत महत्त्वाचा मुख्य रस्ता असून या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याने तात्काळ नवीन डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी युवा क्रांती सामाजिक संघटना, नंदुरबार यांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देण्यात आले असून सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम सुरू न झाल्यास अक्कलकुवा तहसीलदार कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.**

मोलगी ते भगदरी हा रस्ता अनेक दुर्गम गावपाड्यांना जोडणारा प्रमुख दळणवळणाचा मार्ग आहे. तसेच नर्मदा काठावरील अनेक गावांतील नागरिकांना ये–जा करण्यासाठी हा एकमेव मार्ग असल्यामुळे या रस्त्यावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. परिसरातील असंख्य विद्यार्थी मोलगी येथे शाळा, महाविद्यालयात शिक्षणासाठी ये–जा करीत असतात. मोलगी हे गाव मुख्य बाजारपेठ असून येथे अनेक शासकीय कार्यालये कार्यरत आहेत. अलीकडेच मोलगी येथे अपर तहसील कार्यालय सुरू झाल्यामुळे प्रवाशांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दरम्यान या रस्त्यावरून रुग्णवाहिका, शासकीय वाहने तसेच इतर आपत्कालीन सेवा मोठ्या प्रमाणात सुरू असतात. गरोदर माता, रुग्ण तसेच नागरिकांना उपचारासाठी किंवा इतर कामासाठी या रस्त्याचा वापर करावा लागतो. मात्र, सध्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने



वाहन चालविणे अत्यंत कठीण झाले असून अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे केवळ खड्डे बुजवून काम भागणार नसून संपूर्ण रस्त्याचे नवीन डांबरीकरण करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर निवेदनाची प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन मोलगी ते भगदरी या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सात दिवसांच्या आत सुरू करावे, युवा क्रांतीचे प्रदेश सरचिटणीस ॲड. दिपक वसावे, जिल्हा उपप्रमुख डॉ. पंकज तडवी यांनी संबंधित विभागाला हे निवेदन सादर केले. सात दिवसात काम सुरु न झाल्यास अक्कलकुवा येथे तहसीलदार कार्यालयासमोर युवा क्रांती संघटना व स्थानिक नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# वृध्दाच्या हातातील अंगठ्या लांबविल्या

**प्रतिनिधी। चाळीसगाव**

आम्ही सरकारी कर्मचारी आहोत, शहरात लुटमार चालू आहे, अंगावरील सोने काढून घ्या, अशी बतावणी करून व पांडूरंग त्र्यंबक दुसाणे (८२) बंजारा कॉलनी, चाळीसगाव हे एसटी महामंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी असून ते बुधवारी सकाळी ११.५५ वाजेच्या सुमारास स्कुटीने कुलरचा पत्रा दुरूस्तीसाठी घाटरोडकडे जात असतांना, तोंडाला रूमाल बांधलेला इसम दुचाकीवरून मागून आला व आम्ही सरकारी नोकरीला आहे, अंगावरील सोन्याचे दागिने काढून घ्या, लुटमार सुरू आहे.अशी बतावणी करून वृद्धाच्या अंगठ्या घेवून भामटे पसार झाले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# महापालिका रुग्णालयांमध्ये उष्माघात कक्ष सज्ज

## मनपा रुग्णालयांमध्ये खाटा राखीव ; महापौर दीपमाला काळे यांनी घेतला आरोग्य सुविधांचा आढावा

प्रतिनिधी । जळगाव

**शहरात तापमानाचा पारा दिवसागणिक वाढत असल्याने महापालिका रुग्णालयांमध्ये उष्माघात कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. जळगाव महानगरपालिकेच्या महापौर दीपमाला काळे यांनी मंगळवारी शहरातील विविध मनपा रुग्णालयांना भेटी देऊन तेथील आरोग्य सुविधांची सविस्तर पाहणी केली. छत्रपती शाहू महाराज रुग्णालय आणि भिकमचंद जैन प्रसूतीगृह या ठिकाणी भेट देऊन त्यांनी रुग्णांना मिळणाऱ्या सेवा, स्वच्छता आणि उष्माघात कक्षाच्या तयारीचा आढावा घेतला.**



महापौरांनी सर्वप्रथम छत्रपती शाहू महाराज हॉस्पिटलला भेट दिली. हे रुग्णालय जे.पी. ट्रस्टतर्फे चालविले जात असून, ट्रस्टने रुग्णालयाची अतिशय उत्तमरित्या काळजी घेतल्याचे यावेळी दिसून आले. रुग्णालयातील कार्डियालॉजी, स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र, मेडिसिन, एक्स-रे, सोनोग्राफी, बालरोग विभाग, सुपर स्पेशालिटी विभाग, शस्त्रक्रिया गृह, अतिदक्षता विभाग आणि लॅबोरेटरी अशा सर्व विभागांची महापौरांनी पाहणी केली. रुग्णालयातील पुरेसे मनुष्यबळ आणि अत्याधुनिक सुविधा पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. विशेषतः रुग्णालयातील स्वच्छता आणि रुग्णांच्या सोयीसाठी लावण्यात आलेले दिशादर्शक फलक यांचे त्यांनी कौतुक केले. याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाश चौबे, प्रशासकीय अधिकारी संतोष नवगाळे उपस्थित होते. यावेळी आशा वर्कर्सनी देखील महापौरांची भेट घेऊन आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर महापौरांनी दोन्ही रुग्णालयांतील उष्माघात कक्षाची विशेष पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी मनीषा उगले, डॉ. पूजा कोल्हे, डॉ. सायली पवार यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उष्माघाताची कोणतीही लक्षणे जाणवल्यास नागरिकांनी घाबरून न जाता तातडीने जवळच्या मनपा रुग्णालयात येऊन उपचार घ्यावेत, असे आवाहन महापौर दीपमाला काळे यांनी यावेळी केले.

- **शाहू महाराज रुग्णालय: ४ खाटा राखीव.**
- **भिकमचंद जैन रुग्णालय: ७ खाटा राखीव.**

### भिकमचंद जैन प्रसूतीगृहात मनुष्यबळ भरतीचे आश्वासन

महापौरांनी शिवाजीनगर येथील भिकमचंद जैन प्रसूतीगृह रुग्णालयाला भेट दिली. या ठिकाणी सध्या केवळ क्षयरोग विभागाची ओपीडी सुरू असून प्रसूतीगृह बंद आहे. हे प्रसूतीगृह भविष्यात पुन्हा सुरू करण्याबाबत सकारात्मक कार्यवाही केली जाईल, असे महापौरांनी स्पष्ट केले. या भेटीदरम्यान कर्मचाऱ्यांनी कक्ष सेवक आणि परिचारिका वर्गाची प्रचंड कमतरता असल्याचे महापौरांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर बोलताना महापौर म्हणाल्या, पुढील महिन्याभरात येथे रिक्त जागांवर भरती प्रक्रिया राबवता येईल का, याचा प्रशासन नक्कीच गांभीर्याने विचार करेल.

## थोडक्यात

### समता सैनिक दल वर्धापन दिनानिमित्त उद्या बाईक रॅली

**जळगाव ।** समता सैनिक दलाच्या वर्धापन दिनानिमित्त दि.१३ मार्च रोजी जळगाव येथे बाईक रॅलीत आयोजित केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १३ मार्च १९२७ रोजी समता सैनिक दलाची स्थापना केली होती. १३ मार्च हा समता सैनिक दलाचा वर्धापन दिवस अर्थात शताब्दी वर्ष असून १३ मार्च रोजी या महान संघटनेच्या स्थापनेस १०० वर्षे होत आहेत. त्यानुसार १३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक रेल्वे स्टेशन जळगाव येथून मोटारसायकल रॅलीचे आयोजन केले आहे. शहरातील मुख्य मार्गांवरून ही रॅली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक रेल्वेस्टेशन जळगाव येवून विसर्जित होईल. या रॅलीत गणवेशधारी सैनिकांसोबत गणवेश नसलेले समर्थक, सदस्य, नागरिक, महिलांनीही सहभागी व्हावे,असे आवाहन समता सैनिक दल राज्य संघटक विजय निकम यांनी केले आहे.

### मू. जे. महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट

**जळगाव ।** येथील अग्रगण्य एफएमसीजी कंपनी मारीको ली. यांच्या सहकार्याने मू. जे. महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागात नोकरी संधी मुलाखत उपक्रम आयोजित करण्यात आला.या उपक्रमात एम.एस्सी. शाखेतील २७ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कंपनीकडून ट्रेनी पदासाठी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.मुलाखत प्रक्रियेसाठी कंपनीकडून हर्षल घोरपडे, राहुल चौधरी, तेजस्विता जाधव उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ज्ञान, प्रयोगशाळेतील कौशल्ये तसेच उद्योगक्षेत्रातील काम करण्याची तयारी यांचे मूल्यमापन केले.

## वडिलांवरील हल्ल्याचा बदला घेण्यासाठी मुलाने केला गावठी कट्ट्याने गोळीबार

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील गुन्हेगारीच्या घटनांनी पुन्हा एकदा डोके वर काढल्याचे चित्र समोर आले असून, वडिलांना झालेल्या मारहाणीचा बदला घेण्यासाठी एका तरुणाने गावठी बंदुकीतून बेछूट गोळीबार केल्याची घटना उघडकीस आली आहे. सुदैवाने या गोळीबारात कोणालाही दुखापत झालेली नाही; मात्र, भरवस्तीत झालेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**



वाल्मिक नगरातील श्रीराम चौक परिसरात राहणारे रसाल राठोड (वय ४८) हे नेरीनाका स्मशानभूमी परिसरातून कामानिमित्त जात होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या तिघांनी त्यांना अडवून वाद घातला. तसेच बेदम मारहाण केली. या हल्ल्यात रसाल राठोड यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. जखमी अवस्थेत असताना त्यांनी तातडीने आपल्या मुलगा अनिल राठोड याला फोन करून घडलेली घटना सांगितली. वडिलांवर झालेल्या हल्ल्याची माहिती मिळताच संतापलेल्या अनिलने हल्लेखोरांचा शोध सुरू केला. काही वेळातच त्याला वाल्मीक नगरातील घरकुल चौक परिसरात त्यांच्या वडिलांना मारहाण करणारे तिघे जण बसलेले दिसले. संतापलेल्या अनिलने त्याची दुचाकी त्यांच्या दिशेने वळवली आणि कमरेला लावलेल्या गावठी बंदुकीतून त्यांच्या दिशेने दोन गोळ्या झाडल्या. गोळीबाराचा मोठ्ठा आवाज होताच परिसरात एकच गोंधळ उडाला. नागरिकांनी घाबरून पळापळ केली. सुदैवाने बेछुट गोळीबारात कोणालाही दुखापत झाली नाही. घटनेची माहिती मिळताच शनिपेठ पोलीस ठाणे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून घटनास्थळावरून काही महत्त्वाचे पुरावे गोळा केले. तसेच घटनास्थळाच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासण्यासही सुरुवात केली.

दरम्यान, पोलिसांनी तातडीने कारवाई करत मारहाण करणाऱ्या गटातील प्रशांत चौधरी आणि हिमांशू सांखला यांना ताब्यात घेतले. तसेच दुसऱ्या गटातील सुनील राठोड यालाही चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतले.

## महामंत्रानेच मानवजातीचे कल्याण : पार्थ सारथी प्रभुजी

प्रतिनिधी । पाचोरा

**हरे कृष्ण महामंत्रानेच मानवजातीचे खरे कल्याण होऊ शकते,असे प्रतिपादन पार्थ सारथी प्रभुजी यांनी केले.**

पाचोरा येथील वरखेडरोड वरील श्री जगन्नाथ इस्कॉन मंदिरात गौरांग महाप्रभू महिमा प्रवचन भक्तिभावात संपन्न झाले. गौर पूर्णिमा महोत्सवानिमित्त भगवान श्री चैतन्य (गौरांग) महाप्रभू यांच्या दिव्य प्रवचन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात उत्साहपूर्ण हरिनाम संकीर्तनाने करण्यात आली. भक्तांनी हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे हरे राम हरे राम, राम राम हरे हरे या महामंत्राच्या गजरात मंदिर परिसर दुमदुमून टाकला. यावेळी पार्थ सारथी प्रभुजी यांनी गौरांग महाप्रभू महिमा या विषयावर प्रभावी व प्रेरणादायी प्रवचनात त्यांनी सांगितले की, भगवान श्रीकृष्णांनीच कलियुगातील जीवांचे उद्धार करण्यासाठी श्री चैतन्य महाप्रभू म्हणून अवतार घेतला. त्यांनी संपूर्ण मानवजातीला नामसंकीर्तनाचा सोपा व श्रेष्ठ मार्ग दिला. हरे कृष्ण महामंत्रानेच मानवजातीचे खरे कल्याण होऊ शकते. जात-पात, श्रीमंती-गरिबी यापेक्षा भगवन्नाम श्रेष्ठ असून प्रत्येकाने नम्रतेने भगवानाचे नामस्मरण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कलियुगात मनःशांती, आध्यात्मिक उन्नती आणि जीवनातील आनंदासाठी भगवन्नाम जप हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. प्रवचनानंतर मंदिरातील श्री श्री राधा-कृष्ण व गौर-निताई यांच्या दिव्य विग्रहांचा अभिषेक व भव्य महाआरती करण्यात आली. त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यशस्वी आयोजनासाठी इस्कॉन मंदिरातील सेवेकरी व भक्तांनी विशेष परिश्रम घेतले.



## गो.से.हायस्कूलमध्ये जागतिक महिला दिन साजरा

प्रतिनिधी । पाचोरा

येथील पीटीसी श्री.गो.से. हायस्कूलमध्ये जागतिक महिलादिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक एन .आर. पाटील यांचे हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



त्यांनी जागतिक महिला दिन म्हणजे महिलांनी समाज उत्कर्षासाठी केलेल्या जाणीवपूर्वक प्रयत्नांसाठी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असून समाजातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांनी आपल्या कार्यातून केवळ कुटुंबच नव्हे तर राष्ट्रीय हितासाठी मोठे योगदान दिले असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी शाळेच्या पोषण आहारासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या पोषण आहार सेविका,शेतकरी पत्नी तसेच स्वच्छता कर्मचारी भगिनींचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख महेश कौंडिण्य, ज्येष्ठ शिक्षक डी.डी.विसपुते,पोषण आहार समिती प्रमुख एन. एस.पाटील, शिक्षकेतर कर्मचारी विजय महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## वडगाव नालबंदी-पळासखेडे आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना राज्यस्तरीय मानांकन

प्रतिनिधी । पाचोरा /भडगाव

**राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासक कार्यक्रमा अंतर्गत (छट-ड) राज्यस्तरीय गुणवत्ता मानांकन नुकतेच जाहीर झाले आहे.त्यात भडगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र-पिंपरखेड अंतर्गत येणाऱ्या वडगाव नालबंदी व पळासखेडे आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना राज्यस्तरीय नामांकन जाहीर झाले आहे.ही बाब भडगाव तालुका आरोग्य विभागासाठी अभिमानास्पद आहे.**




याबाबत अधिक माहिती देताना वडगाव नालबंदी येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. निखिल गणगे यांनी सांगितले की छट-ड मानांकन मिळवलेल्या उपकेंद्रांमध्ये औषधसाठा,स्वच्छता,रुग्णांशी संवाद,तातडीची सेवा आणि सुसज्ज पायाभूत सुविधा यावर विशेष भर दिला जातो. माझ्याकडे वडगाव नालबंदी उपकेंद्रासोबत पळासखेडे उपकेंद्राचा ही अतिरिक्त चार्ज होता.दोन्ही उपकेंद्रांना नामांकन मिळाले.याचे सर्व श्रेय सर्व माझ्या अधिकाऱ्यांना व माझ्यासोबत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आहे.त्यात जळगाव जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर व भडगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. समाधान वाघ यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपरखेडचे वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिक भोसले,डॉ.निलेश देसले, आरोग्य निरीक्षक संजय सोनार कळवाडीकर यांनी वेळोवेळी बहुमूल्य मार्गदर्शन केलेले आहे.तसेच वडगाव नालबंदी येथील आरोग्यसेविका सुरेखा परदेशी, आरोग्य सेवक कमलेश सोनवणे,पळासखेडे येथील आरोग्यसेविका निलीमा माळी, आरोग्य सेवक विजय खेडकर, वडगाव नालबंदी व पळासखेडे येथील सर्व आशा सेविका असे सर्वांचे सहकार्य लाभले. थोडक्यात हे यश सांघिक आहे.

राज्यस्तरीय नामांकन मिळाल्यामुळे भविष्यात यापेक्षा अधिक काम करावे लागेल.असे डॉ.निखिल गणगे यांनी मत व्यक्त केले.

## कॅन्सर प्रतिबंधक लस महापालिकेतर्फे मोफत



प्रतिनिधी । जळगाव

**महिलांमध्ये वाढत चाललेल्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या धोक्याला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि जळगाव महानगरपालिकेच्यावतीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. शहरातील मुलींचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात करण्यात आली असून, खासगी रुग्णालयात सुमारे ५ ते ७ हजार रुपये किंमतीची असलेली ही लस आता महापालिकेतर्फे मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

जळगाव येथील छत्रपती श्री शाहू रुग्णालयात आयोजित कार्यक्रमातून या लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाला महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील तसेच महिला व बालकल्याण सभापती सिंधुताई कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते लसीकरण केंद्राचे उद्घाटन करून मुलींना लस घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

**मुलींच्या आरोग्यासाठी महत्त्वाची योजना**

गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणाऱ्या गंभीर आजारांपैकी एक आहे. योग्य वयात क्ष्रत लस घेतल्यास या आजाराचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्यांना परवडत नसलेली ही लस शासनाने मोफत उपलब्ध करून दिल्याने गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलींना मोठा दिलासा मिळणार आहे.

### पालकांना आवाहन

**महानगरपालिकेच्या वतीने १४ वर्षांवरील सर्व पात्र मुलींनी जवळच्या महापालिका आरोग्य केंद्रावर जाऊन ही लस घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मुलींचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा, असेही प्रशासनाने नमूद केले आहे.**

## महामार्ग स्वच्छतेचा महापौरांकडून ऑन द स्पॉट आढावा!

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महापालिकेच्या महापौर दीपमाला काळे यांनी शहराच्या प्रवेशद्वाराला म्हणजेच महामार्गाला स्वच्छ आणि सुंदर करण्याचे ध्येय हाती घेतले आहे. या अभियानांतर्गत गेल्या दोन आठवड्यांपासून महामार्गाच्या दुतर्फा असलेला कचरा आणि साचलेले वेस्ट मटेरियल उचलण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर मंगळवारी महापौरांनी महामार्गावर टी. एम. नगर परिसरात परिसरात अचानक भेट देऊन प्रत्यक्ष सुरू असलेल्या कामाची पाहणी केली.**

जेसीबीच्या साहाय्याने कामाला वेग आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून महामार्गाच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला होता. महापौरांच्या सूचनेनुसार गेल्या १५ दिवसांपासून हा परिसर चकाचक करण्याचे काम सुरू आहे. मंगळवारी पाहणी दरम्यान टी. एम. नगर परिसरात जेसीबीचा वापर करून सर्व वेस्ट मटेरियल आणि डेब्रिज उचलण्याचे काम वेगाने सुरू असल्याचे दिसून आले. महामार्गावरील कचरा उचलण्याच्या कामाची प्रगती पाहून महापौरांनी समाधान व्यक्त केले. मात्र, ही स्वच्छता केवळ तात्पुरती न राहता सातत्यपूर्ण राहावी, यासाठी त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना आणि संबंधित विभागाच्या अधिकार्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. शहराच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या या मुख्य मार्गावर पुन्हा कचरा साचणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेश त्यांनी दिले.



### राष्ट्रीय महामार्गावर केली कामाची पाहणी

या पाहणी दौऱ्यामुळे महापालिका प्रशासन आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांमध्ये तत्परता दिसून येत असून, जळगावचा महामार्ग आता मोकळा श्वास घेताना दिसत आहे.

### चर्मकार महासंघाच्या शाखेचे आज उद्घाटन

प्रतिनिधी । चोपडा

मंगरूळ येथे दि. १२ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजता राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे शाखेचे उद्घाटन धरणगांव येथील राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे व मंगरूळ येथील सरपंच व चोसाका अध्यक्ष अतुल ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपाध्यक्ष अरुण मोरे, चोपडा तालुका अध्यक्ष सोपान मोरे, जितेंद्र विसावे, निलेश वाघ, मंगल चव्हाण, प्रभू अहिरे, विकी अहिरे, सचीन विसावे हे उपस्थित राहणार आहेत.तरी चोपडा तालुक्यातील व मंगरूळ गावातील व परिसरातील सर्व चर्मकार समाज बांधवानी उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघाने केले आहे.

# चोपड्यात गॅस टंचाईचा बनाव ब्लॅकमध्ये सिलिंडर विक्री

## ग्राहकांची होतेय मोठ्याप्रमाणात लूट; पुरवठा अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

प्रतिनिधी । चोपडा

**इराण-इस्त्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन व गॅस पुरवठ्याबाबत देशभरात निर्माण झालेल्या अनिश्चिततेचा फायदा घेत शहरात काही गॅस एजन्सींमार्फत ग्राहकांची लूट सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे. गॅस सिलिंडरचा तुटवडा असल्याचे कारण देत अनेक ग्राहकांना रिकाम्या हाताने परत पाठवले जात असतानाच दुसरीकडे अवाजवी दराने सिलिंडर ब्लॅकमध्ये विक्री होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत.**



शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या एका गॅस एजन्सीवर दररोज सकाळपासूनच ग्राहकांच्या लांबलचक रांगा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. घरगुती गॅस सिलेंडर घेण्यासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्ग मोठ्या संख्येने एजन्सीवर येत असतात. मात्र एजन्सीवर गॅस उपलब्ध नसल्याचे सांगत ङ्गङ्गगॅसची गाडी आलेली नाहीफ्फ किंवा ङ्गङ्गसाठा संपला आहेफ्फ असे कारण देत अनेकांना परत पाठवले जात असल्याचे नागरिक सांगतात.

त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून संतापाची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, याच एजन्सीवर काम करणारे काही कर्मचारी किंवा त्यांच्याशी संबंधित मध्यस्थांकडून गॅस सिलेंडर ब्लॅकमध्ये उपलब्ध करून दिले जात असल्याचा आरोप केला जात आहे. अधिकृत दरापेक्षा जास्त पैसे घेऊन सिलिंडर देण्यात येत असल्याची चर्चा असून काही ठिकाणी सिलिंडर ११०० ते १२०० रुपयांपर्यंत विक्री होत असल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या प्रकारामुळे शहरात 'अंधेरी नगरी चौपट राजा' अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा रंगली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एजन्सीवर कोणाचाही वचक नसल्यासारखी परिस्थिती दिसून येत असून 'हम करे सो कायदा' अशा पद्धतीने कारभार सुरू असल्याचा आरोपही केला जात आहे. गॅससारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यात असा प्रकार घडत असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे. या पार्श्वभूमीवर तहसीलदार भाऊसाहेब थोरात तसेच पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून या प्रकरणाची चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. ग्राहकांची होणारी लूट थांबवून गॅसचा सुरळीत पुरवठा सुरू करावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

### ➤ पंपावरही पेट्रोल संपल्याचा बनाव

शहरातील काही पेट्रोल पंपांवरही पेट्रोल उपलब्ध असूनदेखील 'पेट्रोल संपले' असे सांगत वाहनधारकांना परत पाठवले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे वाहनधारकांचीही मोठी गैरसोय होत असून पुरवठा अधिकाऱ्याने या प्रकाराची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# समाजकार्य महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेवर कार्यशाळा

प्रतिनिधी । चोपडा

**येथील भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग या विषयावरील कार्यशाळा पार पडली.**

या कार्यशाळेसाठी दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील प्रा.डॉ. कुणाल गायकवाड यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी विचारपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य प्रा.डॉ. आशिष गुजराथी, कक्षाचे समन्वयक प्रा.डॉ. राहुल निकम आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा.डॉ. राहुल निकम यांनी सदर कार्यशाळेची आवश्यकता



आणि उद्देश स्पष्ट केला. यावेळी प्रा.डॉ. कुणाल गायकवाड यांनी समाजकार्य शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेची उपयोगिता समजावून सांगितली. संशोधन, अहवाल लेखन, समुदाय संघटन आणि विकास या समाजकार्यातील महत्वपूर्ण पद्धतीत कृत्रिम बुद्धिमत्तेने कशाप्रकारे उत्तम कार्य करता येऊ शकते हे पीपीटीद्वारा समजावून सांगितले.

# 'श्री शिवाय नमस्तुभ्यम' हा महादेवाशी संवाद साधण्याचा थेट मार्ग : पं.प्रदीप मिश्रा

प्रतिनिधी । पाडळसे

**श्री शिवाय नमस्तुभ्यम हा केवळ मंत्र नसून साक्षात भगवान महादेवाशी बोलण्याचा तो एक सुलभ मार्ग आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कथाकार पंडित प्रदीप मिश्रा यांनी कथेच्या पहिल्या दिवशी केले.**

'श्री शिवाय नमस्तुभ्यम' हा केवळ मंत्र नसून साक्षात भगवान महादेवाशी बोलण्याचा तो एक सुलभ मार्ग आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कथाकार पंडित प्रदीप



मिश्रा यांनी कथेच्या पहिल्या दिवशी केले. पाडळसे-अकलूद शिवारात सुरू झालेल्या या ज्ञानयज्ञात भाविकांची अभूतपूर्व गर्दी लोटली असून, पहिल्याच दिवशी एका भाविक महिलेच्या पत्राने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ते म्हणाले की, लहानपणी मुलांचे मन जसे भोजनात रमत असते, तसेच त्यांचे मन भजनातही रमले पाहिजे. बालपणी केलेले भक्तीचे संस्कार आयुष्यभर माणसाला संकटातून मार्ग काढण्यास मदत करतात. नंदुरबारच्या महिलेचा अनुभव कथेच्या वेळी वाचून दाखवण्यात आला. एका पत्राने मंडपातील हजारो भाविकांच्या डोळ्यांत पाणी आणले. कथा स्थळावर भाविकांचा महासागर-कथेच्या पहिलच्या दिवशी दुपारी २ वाजता कथेला सुरुवात होताच हर हर महादेव आणि श्री शिवाय नमस्तुभ्यमच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

## थोडक्यात

### गुढे येथे डासांच्या संख्येत वाढ

**भडगाव ।** तालुक्यातील गुढे येथे गावातील संपूर्ण गटारी घाणीने तुडूंब भरल्या आहेत. त्यामुळे गावात मोठ्याप्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. डासांच्या संख्येत मोठ्याप्रमाणात वाढ झाली असून गटारी तात्काळ साफ कराव्यात. तसेच संपूर्ण गावात कानाकोपऱ्यात डास प्रतिबंधक औषधी फवारणी बरोबर धुरळणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आता उन्हाळ्याचे दिवस असून आपोआपच डासांच्या उत्पतीत मोठ्याप्रमाणात वाढ झाली आहे. त्यात गावातील गटारींची कधीपासून साफसफाई करण्यात आली नसल्याने या गटारींच्या घाणीमुळे डास निर्माण झाले आहेत.

# आर.टी.ई. प्रवेशासाठी १ किमीची अट हायकोर्टाने ठरविली रद्द

प्रतिनिधी । धरणगाव

**शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत २५ टक्के मोफत प्रवेश प्रक्रियेत राज्य सरकारने लागू केलेली शाळेपासून घराचे १ किलोमीटर अंतराची अट नागपूर खंडपीठाने रद्द ठरवली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाचा मार्ग पुन्हा मोकळा झाला असून पालकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. या निर्णयामागे सामाजिक कार्यकर्ते किरण आनंदा माळी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.**

यावर्षी राज्य सरकारने प्रवेश नियमांमध्ये बदल करून घरापासून शाळेचे



अंतर ३ किलोमीटरवरून १ किलोमीटर केले होते. त्याचबरोबर नोंदणीकृत भाडेकराराची सक्ती करण्यात आली होती. या कठोर अटींमुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील अनेक गरीब कुटुंबांची मुले प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. या निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्ते किरण माळी यांनी शिक्षण मंत्री ना. दादा भुसे, मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांना वारंवार निवेदने देत ही अट रद्द करण्याची मागणी लावून धरली होती.

# दिव्यांग विद्यार्थ्यांची सेवा हे व्रत मानावे

## गटविकास अधिकारी भावना भोसले यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । धरणगाव

**शिक्षकांचे स्थान समाजात अत्यंत मानाचे आहे. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असताना प्रत्येक शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक तसेच पालकही असतो. विशेषत: दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण देणे ही केवळ जबाबदारी नसून एक मोठी सामाजिक बांधिलकी आहे. त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांची सेवा हे व्रत मानून शिक्षकांनी कार्य करावे, असे आवाहन धरणगाव तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी डॉ. भावना भोसले यांनी केले.**

धरणगाव येथील जिल्हा परिषद मराठी शाळा क्रमांक १ येथे आयोजित धरणगाव तालुक्यातील



दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या थेरेपी सेवा शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी धरणगाव बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्र सैंदाणे, जिल्हा समन्वयक राहुल चौधरी, झुरखेडा केंद्रप्रमुख विकास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. समग्र शिक्षा अंतर्गत समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत गट साधन केंद्र, पंचायत समिती शिक्षण विभाग धरणगाव यांच्या वतीने ० ते १८ वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्पीच थेरपी, फिजिओथेरपी व ऑक्युपेशन थेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तालुक्यातील विविध माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील दिव्यांग विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांना आवश्यक थेरपी सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. फिजिओथेरपीसाठी विद्यार्थ्यांची तपासणी यश हेल्थ केअर सेंटर अँड पॉली क्लिनिक येथे करण्यात आली.

# भोकर येथे महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

प्रतिनिधी । चोपडा

**प्रा.भाऊसाहेब सोनवणे युवा ग्रुपतर्फे विशाल देवकर ( सचिव,श्रीकृष्ण शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ जळगांव )यांचे सहकार्याने जागतिक महिला दिनानिमित्त भोकर गावातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला.**

भोकरच्या सरपंच प्रमिला सोनवणे,जलसंपदा विभागातील




कालवा निरीक्षक ममता सोनवणे, मोनालिका पवार, चंद्रभागा कोळी, योगिता सोनवणे, हेमलता पवार इंदुबाई पवार, अलका सोनवणे,कविता सपकाळे आदींचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी गावातील असंख्य महिला व नागरिक उपस्थित होते.

# नायगाव जि.प.शाळेत व्यवस्थापन समिती गठीत

प्रतिनिधी । यावल

**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नायगाव (ता.यावल) येथे शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत करण्यात आली. मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा २००९ नुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत दर दोन वर्षांनी व्यवस्थापन समिती पुनर्गठीत करण्यात येते. त्यानुसार शाळेच्या विद्यार्थ्यांचे माता-पालकांची सभा आयोजित करण्यात आली. सदर सभेतून शाळा व्यवस्थापन समितीसाठी सदस्यांची निवड करण्यात आली.**

इयत्ता पहिली ते सातवीच्या वर्गातील



वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांची शाळा व्यवस्थापन समितीमध्ये निवड करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीच्या निकषानुसार ७५ टक्के पालकांमधून सदस्यांची निवड करण्यात आली. यानुसार अनुसूचित जमाती (एस.टी प्रवर्ग) विद्यार्थी संख्या जास्त असल्याने पाच सदस्य निवड करण्यात आले. ते खालील प्रमाणे सरफराज जुम्मा तडवी (रेहान सरफराज तडवी इ.पाचवी), असलम अमीर तडवी (अल्फिया असलम तडवी इ.तिसरी), रेहाना फिरोज तडवी (माहीर फिरोज तडवी इ. पहिली),अकिला अफजल तडवी (आलिया अफजल तडवी इ.सहावी), जाकीरा विनोद तडवी (आरजू विनोद तडवी इ.सातवी),अनुसूचित जाती प्रवर्गातून अक्षय मधुकर सपकाळे यांची निवड करण्यात आली. ओबीसी प्रवर्गातून विलास धोंडू मिस्तरी(उपासना विलास मिस्तरी इ. तिसरी) तसेच ज्योती नेमीचंद मिस्तरी (भावेश नेमीचंद मिस्तरी इ. दुसरी )यांची निवड करण्यात आली.एस.बी.सी महिला प्रवर्गातून निराशा गोरखनाथ कोळी (हर्षल गोरखनाथ कोळी इयत्ता पहिली )यांची निवड करण्यात आली.


● तसेच शिक्षणप्रेमी म्हणून विजय छगन गोसावी यांची निवड करण्यात आली. शिक्षक प्रतिनिधी म्हणून भरत भीमराव शिरसाठ उपशिक्षक यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. स्थानिक स्वराज्य प्रतिनिधीतून प्रशासक असल्याने सध्या हे पद रिक्त ठेवण्यात आलेले आहे, सदस्य सचिव म्हणून ग्रेडेड मुख्याध्यापक निवृत्ती गोपाळ भिरूड यांची सदस्य सचिव म्हणून निवड करण्यात आली.

# चोपडा पालिकेत थकबाकीदारांसाठी 'अभय योजना'

## थकीत करावरील व्याज व दंड १००% माफ

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपरिषदेच्या वतीने शहरातील नागरिकांना आर्थिक दिलासा देण्यासाठी निवासी मालमत्ताधारकांसाठी विशेष 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. ही योजना २५ मार्च २०२६ पर्यंत लागू राहणार असून या कालावधीत नागरिकांनी थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टी एकरकमी भरल्यास त्या थकबाकीवर आजपर्यंत आकारण्यात आलेल्या व्याज व दंडावर १०० टक्के सूट देण्यात येणार असल्याची माहिती नगरपरिषद प्रशासनाने दिली आहे.**



नगराध्यक्षांचे मत चोपडा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपरिषद सातत्याने प्रयत्नशील आहे. नागरिकांना आर्थिक दिलासा देण्यासाठी आणि थकबाकी कमी करण्यासाठी अभय योजना सुरू करण्यात आली आहे. व्याज व दंडावर १०० टक्के सूट ही मोठी संधी असून शहरातील सर्व निवासी मालमत्ताधारकांनी याचा लाभ घ्यावा. २५ मार्चपूर्वी कर भरून शहराच्या विकासात आपला सहभाग नोंदवावा.

**- नम्रता पाटील, लोकनियुक्त नगराध्यक्ष**

नगरपरिषदेच्या नोंदीनुसार शहरातील अनेक निवासी मालमत्ताधारकांकडे मागील काही वर्षांपासून मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकबाकी प्रलंबित आहे. नागरिकांना आर्थिक सवलत देऊन ही थकबाकी नियमित करण्यासाठी तसेच नगरपरिषदेच्या विकासकामांना गती देण्यासाठी ही विशेष योजना राबविण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी २५ मार्चपूर्वी एकरकमी कर भरल्यास संपूर्ण व्याज व दंड माफ होणार असल्यामुळे ही योजना नागरिकांसाठी मोठी संधी ठरणार आहे. त्यामुळे शहरातील सर्व संबंधित मालमत्ताधारकांनी नगरपरिषद कार्यालयात किंवा संबंधित विभागात जाऊन थकीत रक्कम भरून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नगरपरिषद प्रशासनाने सांगितले की, नागरिकांनी कर वेळेत भरल्यास शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, प्रकाश व्यवस्था यांसारख्या मूलभूत सेवांचा दर्जा अधिक सुधारण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी या योजनेचा लाभ घेत आपली थकबाकी नियमित करावी.

### मुख्याधिकाऱ्यांचे आवाहन



नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते व प्रकाश व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा पुरविल्या जातात. या सेवा सुरळीत ठेवण्यासाठी कर व पाणीपट्टीची वेळेत वसुली होणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांना थकबाकी नियमित करण्याची संधी देणारी अभय योजना राबविण्यात आली आहे. नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन थकबाकी एकरकमी भरावी. अन्यथा पुढील काळात थकबाकीदारांवर कडक वसुलीची कारवाई केली जाईल.

**- रामनिवास झंवर, मुख्याधिकारी**

# नशिराबादमध्ये पुन्हा एकदा दुचाकी जाळण्याची घटना; नागरिक चिंतेत

प्रतिनिधी । नशिराबाद

**शहरातील पेठ परिसरात दुचाकी जाळल्याची आणखी एक घटना समोर आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पेठ भागातील रहिवासी सीताराम बुधा नाथ यांच्या मालकीची दुचाकी क्रमांक (एम एच १९ डीयू ३४९९) ९ मार्च रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी पेट्रोल टाकून पेटवून दिल्याचे समोर आले आहे.**

यापूर्वीही पेठ परिसरातील ज्ञानेश्वर नाथ आणि नारायण धनगर यांच्या दुचाकीला अज्ञातांनी आग लावल्याची घटना घडली होती. त्या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे सांगितले जात असून अजूनही आरोपींचा शोध लागलेला नाही त्यातच ही तिसरी घटना घडल्यामुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.दुचाकी जाळल्याने संबंधित वाहनधारकांचे आर्थिक नुकसान झाले आहे.घटनेची माहिती मिळताच रात्री नशिराबाद पोलिसांना कळविण्यात आले. स्थानिक नागरिकांनी याविषयी प्रशासनाकडे लक्ष वेधले असून अशा प्रकारच्या घटनांना आळा बसण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करून चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी करण्यात येत आहे.